# नितेश राणेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा- खा. गायकवाड

**मुंबई (प्रतिनिधी)**–भाजपच्या नितेश राणेंनी केरळची तुलना पाकिस्तानशी करुन तिथल्या लोकांना दहशतवाद्यांशी जोडण्याचे केलेले विखारी विधान हा संविधानातील सिद्धांतांवर थेट हल्ला आहे. मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्या पदाच्या तत्वांशी केलेला हा विश्वासघात आहे. भाजप नितेश राणेंच्या विखारी आणि विभाजनकारी वक्तव्यांचे समर्थन करते का? असा संतप्त सवाल करत, असंवैधानिक वक्तव्य करणाऱ्या नितेश राणेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा, अशी मागणी मुंबई काँग्रेस अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी सोमवारी केली.

नितेश राणे हे सातत्याने हिंदू मुस्लीम, पाकिस्तान अशी भाषा वापरून एका समाजाला लक्ष्य करत आहेत. केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असल्याने त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. नितेश राणेंचा बॉसफ सागरफ बंगल्यावरून वर्षाफ्रर गेल्यामुळे त्यांची हिम्मत जास्तच वाढलेली दिसते. परंतु मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी नितेश राणे यांच्या विधानावर खुलासा करावा आणि त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी गायकवाड यांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात अशी विभाजनकारी भाषा खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही एका निवडणूक प्रचारात वायनाडची तुलना पाकिस्तानशी केली होती. अशा द्वेषपूर्ण विधानांच्या माध्यमातून भारताच्या सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य म्हणून असलेल्या अस्तित्वाचा विरोध केला जात आहे. विभाजनकारी राजकीय अजेंड्यासाठी भारतीय जनता पक्ष सातत्याने संवैधानिक तत्त्वांची पायमल्ली करत आहे. भाजप–आरएसएसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान कधी स्वीकरलेच नाही. तरीही हा देश संविधानानेच चालणार असून भाजप आणि संघाच्या विधानाने चालणारा नाही, असेही वर्षा गायकवाड यांनी बजावले आहे.

# हा तर भारताच्या एकात्मतेवर हल्ला

## मंत्री नितेश राणेंच्या विधानावर काँग्रेसची टीका

**मुंबई (प्रतिनिधी)**– केरळसारख्या भारतातील एका प्रगत राज्याला मिनी पाकिस्तान बोलणे हे कितपत योग्य आहे? महायुतीचे मंत्री ज्या पदावर बसले आहेत, त्या पदाचा सन्मान राखायला शिकायला हवे. ही भाषा केवळ एका राज्याचा अपमान नसून भारताच्या एकात्मतेवरही हल्ला आहे, अशा शब्दात काँग्रेसने मत्स्यविकास आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या विधानाचा समाचार घेतला आहे.

राणे यांनी रविवारी पुण्यातील पुरंदर तालुक्यातील एका कार्यक्रमात बोलताना, केरळ हे मिनी पाकिस्तान आहे. त्यामुळे राहुल गांधी आणि त्यांची बहीण तेथून निवडून येतात. सारे दहशतवादी त्यांना मतदान करतात, असे विधान केले होते. या विधानावरून काँग्रेसने राणे यांना सोमवारी लक्ष्य केले. केरळ सारख्या राज्याला मिनी पाकिस्तान म्हणणे तसेच राहुल आणि प्रियांका गांधी यांना मतदान करणारे दहशतवादी असे हिणवणे हे उद्योग फक्त भाजपचे मंत्री करू शकतात. काही सकारात्मक करू शकत नसले की भाजप नेते हिंदू – मुस्लिम, भारत– पाकिस्तान हाच अजेंडा राबवतात. पण मंत्री पदावर बसलेल्या व्यक्तीने सार्वजनिक रित्या बोलताना, वागताना भान बाळगले पाहिजे. पण नितेश राणे यांनी सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

जितकी जास्त बाष्कळ बडबड तितकी जास्त प्रगती हे समीकरण भाजपमध्ये असल्याने मंत्र्यांनी पुन्हा एकदा तारे तोडले आहेत. पण मुख्यमंत्र्यांनी किमान आपल्या सहकाऱ्याला समजूत द्यावी. ही भाषा, हे वर्तन योग्य नाही. मंत्र्यांनी आपल्या पदाचे ग्रहण करताना शपथ घेतली आहे याची तरी आठवण ठेवावी आणि समाजात तेढ वाढणार नाही असे वर्तन करू नये, असा सल्ला थोरात यांनी नितेश राणे यांना दिला आहे. तर, महायुतीच्या नेत्यांकडून वेळोवेळी समाजात द्वेष निर्माण करणारी प्रक्षोभक वक्तव्ये केली जातात. जर केरळ पाकिस्तान असेल, तर केंद्र सरकार काय करत आहे? असा सवाल विधानसभेतील माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना अतिरेकी मतदान करतात अशी मुक्ताफळे उधळणे हा मतदारांचा अपमान नाही का? गुंडगिरी आणि प्रक्षोभक भाषा वापरून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या नेत्यांनाच आम्ही मंत्री बनवू या पात्रतेवर महायुतीचे राज्यात मंत्रिमंडळ बनले आहे. त्यामुळे वेळोवेळी असे वक्तव्य करून आपली पात्रता सिद्ध करण्याची स्पर्धा महायुतीत लागलेली दिसत आहे. पात्रता सिद्ध करण्याच्या शर्यतीत आपली बुद्धी गमावलेल्या महायुतीच्या मंत्र्यांकडून महाराष्ट्रातील जनतेने कसली अपेक्षा न करणे योग्य, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली आहे.

देशाची एकता आणि अखंडता राखण्याची शपथ घेऊन मंत्री झालेले नितेश राणे केरळला भारताचा पाकिस्तान म्हणतात. भाजपला मतदान न करता काँग्रेस तसेच इतर विरोधी पक्षांना मतदान करतात म्हणून त्यांना दहशतवादी म्हणणाऱ्या व्यक्तीला मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार आहे का? असा सवाल काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे. मंत्री नितेश राणे यांचे विधान महाराष्ट्राची प्रतिमा कलंकित करणारे असून भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर खुलासा करावा, अशी मागणी लोंढे यांनी केली आहे.

# १११० बांगलादेशींना मालेगावात जन्म दाखले

## भाजप नेते किरीट सोमय्या यांचा 'व्होट जिहाद'चा आरोप

**मालेगाव**– मालेगाव हे रोहिंग्यांचे आश्रयस्थान झाले आहे. आपल्याकडे यासंदर्भात मोठ्या प्रमाणात पुरावे आले आहेत. मालेगावातून व्होट जिहाद सुरु आहे, असा आरोप भारतीय जनता पक्षाचे नेते किरीट सोमय्या यांनी केला. ते म्हणाले, मालेगावात १११० बांगलादेशी आणि रोहिंग्यांना जन्मदाखला देण्यात आला आहे. ही खूप गंभीर बाब आहे. या प्रकरणात मी स्वतः लक्ष देत आहे. या प्रकरणात दोन प्रकारचे गोंधळ दिसत आहे. एकात सर्व सामान्य माणूस फसत आहे. दुसऱ्या बाजूला राजकारणी, माफिया, गुंड, भ्रष्टाचारी, ड्रग माफिया ब्लॅक मनी व्हाईट करण्यासाठी मनी लॉड्रींग करीत आहे, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला.

**अधिकाऱ्यांचे निलंबन करावे**

किरीट सोमय्या म्हणाले, मालेगावात जे भारतीय नाहीत त्या १११० जणांना जन्माचा दाखल दिला गेला आहे. ४०० अर्ज अजून प्रलंबित आहेत. मालेगाव मनपातून हे जन्मप्रमाणपत्र दिले गेले आहे. या सर्व लोकांनी अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दिले आहे. त्यांच्याकडून आधारकार्ड झाले असल्याची शक्यता आहे. या सर्व लोकांची चौकशी करावी. त्यांचे जन्मप्रमाणपत्र रद्द करावी, अशी मागणी आपण सरकारकडे करणार आहे. मालेगाव हे व्होट जिहादचे केंद्र बनले आहे. या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांचा सहभाग आहे, त्यांचे निलंबन करण्यात यावे.

**अधिकाऱ्यांकडून चूक मान्य**

जिल्हाधिकारी कार्यालयातून आणि आयुक्त कार्यालयातून हे दाखले देऊन टाकला आहे. त्यावर एकाच पत्ता आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्यांना भारतीय बनवण्यासाठी जन्म दाखला देण्याचा हा प्रकार आहे. मालेगाव तहसीलदार, महानगरपालिका आयुक्त यांनी आपली चूक मान्य केली आहे. अनवधानाने हे जन्मप्रमापत्र देण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## पान १ वरुन

पान १ वरुन

### शेतकऱ्यांसाठी डीबीटी धोरण बळकट करणार

कार्यभार स्वीकारला. त्यावेळी बोलताना कोकाटे यांनी शेती आणि शेतकऱ्यांविषयीचा आपला मनोदय व्यक्त केला. राज्यात लाडकी बहीण योजनेप्रमाणे पैसे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कसे जातील यावर भर दिला जाईल. कृषी विभागाचा आढावा घेऊन आवश्यक तेथे बदल केले जातील, अशी माहिती त्यांनी दिली. राज्यात पीक विमा योजनेत घोटाळा झाल्याचा आरोप केला जात आहे. त्याबाबत अनेक गोष्टी बोलल्या जात असून योजनेवर होत असलेल्या आरोपांची चौकशी करण्यात येईल. त्यामुळे कोणावरही आरोप करणे बरोबर नाही. पिक विमा घोटाळ्याची चौकशी करून जे तथ्य येईल ते समोर आणले जाईल. सध्या तरी नाण्याची एक बाजू तुम्ही पाहली आहे. दुसरी बाजू पडताळली पाहिजे, असेही कोकाटे म्हणाले. कांदा दर, आयात–निर्यात यासारख्या बऱ्याच गोष्टी केंद्राच्या अखत्यारित आहेत. त्यामुळे केंद्र सरकारशी समन्वय साधून काम करू, असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

**आमवस्या, पौर्णिमा बघत नाही**

दरम्यान, मंत्र्यांचे खातेवाटप होऊन दहा दिवस होऊनही खात्याचा कार्यभार स्वीकारला नसल्याबद्दल अनेक मंत्र्यांवर टीका होत होती. आज, सोमवारी आमावस्या असतानाही तुम्ही कार्यभार कसा घेतला? या पत्रकारांच्या प्रश्नावर, शेतकऱ्याला जात, पक्ष आणि धर्म नसतो. अमावस्या, पौर्णिमा फक्त कॅलेंडरपुरती असते. जो काम करतो त्याला मुहूर्त पहायची गरज नाही, असे माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

### गावपुढाऱ्यांना लागले ग्रामपंचायत निवडणुकीचे डोहाळे

आणि १५५ ग्रामपंचायत सदस्यांच्या जागा रिक्त आहेत. गेल्या वर्षभरापासून गाव कारभारी निवडणुक कधी होईल याची वाट पाहून आहेत. सध्या सर्व ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त करण्यात आले आहे. सुरूवातीला लोकसभा व नंतर विधानसभा निवडणुकीमुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. मात्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपवून सव्वा महिला झाला आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायतीची निवडणुक कोणत्याही क्षणी लागू शकते असा अंदाज आहे. या निमित्ताने जिल्ह्यातील ८४ गावातील राजकीय वातावरण तापणार आहे.

दरम्यान, जुलै महिन्यांत प्रसिध्द करण्यात आलेली प्रभागनिहाय मतदार यादी ही लोकसभा निवडणुकीच्या मतदार यादीवर आधारीत होती. आता विधानसभा निवडणुकीनंतर होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नव्याने विधानसभा निवडणुकीच्या मतदार यादीनूसार नव्याने प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करावी लागल्यास त्यात वेळ जाण्याची शक्यता आहे. मात्र याबाबत राज्य निवडणुक आयोगाकडून कोणत्याही सुचना आल्या नसल्याचे जिल्हा निवडणुक शाखेकडून सांगण्यात आले.

**मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींची तालुकानिहाय संख्या पुढील प्रमाणे : नेवासा २६, कर्जत १७, अकोले ८, नगर ७, संगमनेर २, कोपरगाव ३, राहाता १, श्रीरामपूर २, राहुरी ३, शेवगाव ५, पाथर्डी ४, जामखेड ३, श्रीगोंदा १ आणि पारनेर १.**

**१५ ग्रामपंचायतींचा आरक्षण कार्यक्रम प्रसिद्ध**

जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील १५ ग्रामपंचायतींचा प्रारूप प्रभाग रचना आरक्षण कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आला आहे. यावर ३१ डिसेंबर २०२४ ते ६ जानेवारी २०२५ दरम्यान हरकती घेता येणार आहे. त्या हरकतीवर १४ जानेवारीला प्रांतअधिकारी यांच्या समोर सुनावणी होणार असून २४ जानेवारीला अंतिम प्रभाग रचना आरक्षण कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येणार आहे. या १५ ग्रामपंचायतीमध्ये श्रीगोंदा तालुक्यातील ६, अकोले ३, संगमनेर २, पारनेर २, कर्जत २ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

### पालिका, झेडपी निवडणुकीसाठी संघ पुन्हा भाजपच्या मदतीला मैदानात उतरणार

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत तयारीला लागली आहे. भाजपचे मुंबई महानगरपालिका जिंकणीचे प्रयत्न असणार आहेत. गेली २५ वर्षे मुंबई महानगरपालिकेवर शिवसेना (उद्धव बाळसाहेब ठाकरे) गटाची सत्ता आहे. त्यामुळे सत्ताबदल करण्याचा प्रयत्न भाजपकडून होण्याची शक्यता आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजपने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आघाडीच्या सलंग्न संघटनानांशी समन्वय साधण्यास सुरुवात केली आहे. नुकतीच चंद्रशेखर बावनकुळे आणि देवेंद्र फडणवीस यांची संघाच्या संघटनानांशी बैठक झाल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत देखील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजपच्या मदतीसाठी मैदानात उतरण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास भाजपला या निवडणुकांमध्ये मोठे यश प्राप्त करता येऊ शकते.

### भरदिवसा रस्तालूट, १७ लाख पळविले

येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पथकाने घटनास्थळी धाव घेतली. आणि आरोपींचा शोध सुरु केला. तसेच अहिल्यानगर येथील ठसे तज्ञ पथकाने घटनास्थळी धाव घेऊन आरोपींचे ठसे मिळविण्याचा प्रयत्न केला. सदर भामटे ज्या वाहनातून आले होते, ते वाहन माऊली दूध उद्योग परिसरात सुमारे अर्धा तास थांबले होते. त्यांनी पाळत ठेवून सदर रोख रक्कम लुटून नेल्याची चर्चा परिसरात सुरु आहे. भर दिवसा झालेल्या या रस्तालुटीने परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. या घटनेबाबत राहुरी पोलीस ठाण्यात रस्तालुटीचा गन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रस्ते सुरक्षेसाठी कृत्रिम प्रज्ञेचा वापर करा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना

बसेसच्या सुरक्षेसाठी एस.ओ.पी. निश्चित करण्याच्याही सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी केल्या. घाटात मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने यावर अभियांत्रिकी उपाययोजना शोधून काढावी, असेही त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्रात चित्रीकरणाला ऑनलाईन परवानगी**

सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधनाबरोबरच सांस्कृतिक कार्य विभागाशी निगडीत विविध माध्यमातून रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणात होते. हा विभाग सॉफ्ट पॉवर म्हणून काम करतो. कुठल्याही निर्मात्याला महाराष्ट्रात चित्रीकरण करण्यासाठी एक खिडकीद्वारे तात्काळ ऑनलाईन परवानगी देण्यात यावी, अशा सूचना देवेंद्र फडणवीस यांनी सांस्कृतिक कार्य विभागाशी संबंधित बैठकीत दिल्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्ष सोहळ्याचे विशेष आयोजन करून त्यांचे कार्य सर्व शाळा, महाविद्यालयांपर्यत पोहोचण्यासाठी वर्षभराचे नियोजन करण्यात यावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य महान असून त्यांच्या जीवन कार्यावर एका चांगल्या व्यावसायिक चित्रपटाची निर्मिती करण्यात यावी. या चित्रपटासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येईल. मराठी चित्रपटाचे सर्व चलछायाचित्रण मोठ्या प्रमाणात गोरेगाव येथील चित्रनगरीत व्हावे. यासाठी आकारण्यात येणारे दर कमी करावे. हर घर संविधान अंतर्गत प्रत्येक घरात संविधान पोहचले पाहिजे, अशाही सूचनाही फडणवीस यांनी दिल्या.

**आवास योजनेतील प्रत्येक घर सौर ऊर्जेवर करावे**

पंतप्रधान आवास योजनेंअंतर्गत किमान १३ लाख घरकुलांना मंजुरी देण्यात येणार आहे. यासाठी लवकरच घरकुल लाभार्थ्यांना ४५० कोटी रूपयांचा पहिला हप्ता वितरित करण्यात यावा. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी, गतीमान, दर्जेदार अंमलबजावणी आणि लोकसहभागासाठी महाआवास अभियान राबविण्यात यावे. त्याचप्रमाणे या आवास योजनेतील घरे सौर उर्जेवर करण्यात यावी, अशा सूचना फडणवीस यांनी ग्रामविकास विभागाचा आढावा घेताना दिल्या.

**स्मार्ट रेशनकार्डसाठी स्थलांतरीत कामगारांना प्राधान्य द्या**

राज्यातील स्थलांतरित कामगारांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना स्मार्ट रेशनकार्ड देण्यात यावे. त्याचबरोबर स्मार्ट कार्ड देताना ते कुठल्याही राज्यातील असले तरी त्यांना महाराष्ट्रात कुठल्याही रास्त–भाव दुकानात धान्य मिळेल, असे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

अन्नधान्य वाटपामध्ये लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात धान्य वाटप व्हावे यासाठी सर्व रास्त भाव दुकानांमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटे बसवावेत. सर्व शिधापत्रिका धारकांना स्मार्ट शिधापत्रिकांचे वितरण करण्यात यावे. लाभार्थ्यांना वेळेत अन्नधान्याचे वितरण होण्याच्या दृष्टीने एक गाव एक गोदामम उभारण्याची कार्यवाही सुरू करावी. वाहनांचे जिओ टॅगींग करावे, अन्नधान्य वाटपामध्ये एक देश एक शिधापत्रिकाफ धोरण राज्यात राबवण्यात येत आहे. त्याअनुषंगाने स्थलांतरित मजुरांना अन्नधान्य वाटपामध्ये प्राधान्य देण्यात यावे. गरजू लाभार्थ्यांचा सण, उत्सव उत्साहात साजरा व्हावा यासाठी राज्यात सणांच्या काळात आनंदाचा शिधा वाटप करण्यात येतो. या वाटपाची एक दिनदर्शिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

या बैठकीला अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार, ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, राजगोपाल देवरा, संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सचिव वीरेंद्र सिंह, सचिव रवींद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### कुठल्याही हंगामात चाखता येईल उसाचा रस, शास्त्रज्ञांनी तयार केली रस पावडर

हे तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याचा करार केला आहे. डॉ. छाबरा म्हणाले की, उसाच्या रसाची पावडर बनवून शेतकऱ्यांनाही मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे उसाचा वापर आणि किंमत दोन्ही वाढेल.

# लग्नासाठी मुलगी शोधा; शेतकरी मुलाची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी

**मुंबई**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात नव्याने महायुतीचे सरकार स्थापन झाले. मात्र, नवे सरकार स्थापन होण्यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखील राज्यात शासन आपल्या दारी म्हणत शेतकऱ्यांसाठी अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट दूर करण्यासाठी विविध उपाययोजना सुरू करण्याचा निर्णय घेणार अशी वक्तव्य केली. परंतू, सध्या राज्यातील अनेक शेतकरी आर्थिक मदतीपासून वंचित राहिले आहे. तसेच, काही शेतकरी हे शेतमालाला भाव मिळत नसल्यामुळे संकटात सापडले आहेत. परिणामी ऐन लग्नसराईत शेतकरी मुलाला लग्नासाठी मुलगी मिळत नसल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर आपलं लग्न व्हावं यासाठी या शेतकरी मुलाने थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच मुलगी शोधण्याची मागणी केली आहे. (Devendra Fadnavis farmers son urges cm devendra fadnavis over farm products price and marriage issue)

विदर्भातील भंडारा जिल्ह्यात एका अनोख्या बॅनरची चर्चा सुरू आहे. या बॅनरवर शेतकऱ्यांच्या मुलांना लग्नासाठी मुलगी तरी बघून द्याफ, असे लिहिण्यात आले आहे. जयपाल भांडारकर असे शेतकरी पुत्राचे नाव असून त्याने हा बॅनर लावला आहे. डोक्यात टोपी आणि बाशिंग बांधून हातात फलक घेत ही बॅनरबाजी केली. बॅनरबाजी करताना या मुलाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुलगी शोधून देण्याची मागणी केली. त्यानुसार, एक तर आमच्या शेत मालाला भाव द्या, नाहीतर आम्हा शेतकऱ्यांच्या मुलांना लग्नासाठी मुलगी बघून द्या, ज्या दिवशी तुम्ही आम्हा शेतकऱ्यांच्या मालाला योग्य तो भाव द्याल, त्या दिवसापासून शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटतील आणि प्रत्येक मुलीच्या बापाला वाटेल की आता शेतकऱ्याला शेती परवडते. तेव्हा लोक आपल्या मुलीचा हात शेतकऱ्यांच्या मुलाचे हातात देतील, असे शेतकरी पूत्र जयपाल भांडारकर याने म्हटले. दरम्यान, सध्या संपूर्ण महाराष्टात लग्नसराई सुरू आहे. पण शेतकऱ्यांकडे जवळपास पाच ते दहा एकर शेती असूनसुद्धा कोणीच शेतकऱ्यांच्या मुलांना लग्नासाठी मुलगी दाखवायला वा द्यायला तयार नाहीत. यामागचं कारण असे आहे की, शेतकऱ्यांच्या शेत मालाला भाव मिळत नाही. त्यामुळे कोणीच आपली मुलगी शेतकरी मुलांना द्यायला तयार नाही. त्यामुळे एका शेतकरी मुलाने लग्नासाठी मुलगी शोधून द्या अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# राहात्यातील स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**राहाता (वार्ताहर)**– येथील स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे अनावरण वीरभद्र मंदिरात मान्यवांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी चेअरमन साहेबराव निधाने म्हणाले, स्वामी विवेकानंद पतसंस्थेने सामान्य माणसाला आर्थिक आधार देऊन त्याची बाजारपेठेत पत निर्माण केली. त्यामुळे सामान्य माणूस संस्थेच्या दैनंदिन व्यवहारात जोडला गेला. संस्थेने बहुजन हिताय बहुजन सुखाय या उक्तीप्रमाणे माफक दरात कर्ज वितरण तर ठेवीवर आकर्षक व्याजदर दिल्याने संस्थेने अल्पावधी काळात नेत्रदीप प्रगती केली. संस्था कर्जदार व ठेवीदारांसाठी नेहमी वेगवेगळे उपक्रम राबवित असते. दिनदर्शिका उपक्रम हा त्यापैकी एक उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष राजेंद्र दंडवते, संचालक सर्जेराव मते, पांडुरंग ढमढरे, सुनील सदाफळ, विजय सदाफळ, चांगदेव गिधाड, रावसाहेब धुमसे, सुधाकर कुंभकर्ण, ज्ञानेश्वर गाडेकर, सुनील बोरकर, नारायण भुजबळ, सुरेश सदाफळ, अरुण तुपे, शिवाजी सदाफळ, निलेश शेलार, सचिन गाडेकर, वैभव अनप, शंतनु विधाटे, अशोक तुपे यांच्यासह सभासद, ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन सर्जेराव मते यांनी केले तर आभार व्यवस्थापक सागर निरगुडे यांनी मानले.

# भारतीय महिला सोन्यात जगात लय भारी

**मुंबई**– भारतात लग्नकार्य असो वा इतर कार्यक्रम, घरातील महिलांची पहिली पसंती ही सोन्याच्या दागिन्यांना असते. आपल्या देशातील महिलांकडे किडूक–मिडूक का असेना पण सोने असते. सोने हा महिलांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. परंपरा, चालीरिती, धार्मिक कार्य यादृष्टीने भारतीय समाजात सोन्याला महत्व आहे. सोने हे शुभ मानण्यात येते.

World Gold Council च्या एका अहवालानुसार, भारतीय महिलांकडे जवळपास २४,००० टन सोने आहे. हे सोने म्हणजे जगातील सर्वात मोठी सोन्याची खाण आहे. खजिना आहे. थञ्च्छ च्या अहवालानुसार,जगातील एकूण सोन्याच्या साठ्यापैकी भारतीय महिलांकडे ११ टक्के सोने आहे. अर्थात ते दाग–दागिने, बिस्किट, वीटा, नाणे अशा कोणत्याही स्वरुपात असेल. तुम्हाला ऐकून धक्का बसेल की, भारतीय महिलांकडे जितके सोने आहे, ते जगातील टॉप ५ देशांकडील सोन्याच्या साठ्यापेक्षा अधिक आहे.

**अमेरिका, जर्मनी सारख्या देशांकडे किती सोने?**

अमेरिकेकडे एकूण ८००० टन सोने तर जर्मनीकडे ३,३०० टन सोने आहे. याशिवाय इटलीकडे २४५० टन, फ्रान्स देशाकडे २४०० टन आणि रशियाकडे १९०० टन सोने आहे. त्यामानाने भारतीय महिलांकडे कित्येक पटीने अधिक सोने आहे. सोन्याची ही दौलत जगातील महासत्तांकडे पण नाही.

**या राज्यातील महिलांकडे सर्वाधिक सोने**

भारतात सोन्याचा सर्वाधिक वापर दक्षिणेत होतो. भारतातील दक्षिण राज्यातील महिला सोन्याचा सर्वाधिक वापर करतात. त्या सोन्याचे दागदागिने वापरतात. दक्षिण भारतात देशातील एकूण सोन्याच्या ४० टक्के सोने आहे. केवळ तामिळनाडूमध्ये २८ टक्के सोने आहे.

# जीएसटी नंतर तेल-साबणावरील कर कमी झाला

**नवी दिल्ली**– जीएसटीने जीवनावश्यक वस्तूंवर कर लावला नाही, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे. जीएसटीपूर्वी, राज्यांकडे मूल्यवर्धित कर (व्हॅट) आणि उत्पादन शुल्क यांसारख्या स्वतःच्या प्रणाली होत्या.त्यामुळे जीएसटीमुळे तुमचा साबण, तेल, पोळी यावर कर आकारला जातो, असे म्हणणे चुकीचे आहे. मी खात्रीने सांगू शकते की जीएसटीनंतर या सर्व उत्पादनांवरील कर कमी झाला आहे.

जीएसटीने विविध करांचे एकत्रीकरण केले, ज्यामुळे देशभरात करप्रणाली सुलभ आणि एकसमान झाली. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, अनेकांना करात सूट नको आहे, म्हणून आम्ही सुलभ करप्रणाली सुरू केली. वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी आणि त्याचा मध्यमवर्गावरील वाढता बोजा यावर अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, त्यांच्या सरकारने कर प्रणाली न्याय्य आणि सुलभ करण्यासाठी अनेक अर्थपूर्ण प्रयत्न केले आहेत. एका मुलाखतीत त्या म्हणाल्या, मआम्हाला देशातील लोकांसाठी आणखी बरेच काही करायचे आहे. पण आम्हालाही मर्यादा आहेत. अर्थमंत्री म्हणाल्या की, कर प्रणाली सुलभ करण्यासाठी आम्ही नवीन कर व्यवस्था आणली. यामुळे कर आकारणी सुलभ होते आणि करदात्यांना अनेक प्रकारची सूटही मिळते.

# संगमनेरात दोन गटांत हाणामारी

**संगमनेर (शहर प्रतिनिधी)**– एका तरुणाने समाज माध्यमावर वादग्रस्त पोस्ट टाकल्याच्या कारणावरुन दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी संगमनेर बसस्थानक परिसरात घडली. यानंतर काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

सुकेवाडी येथील तरुणाने समाज माध्यमावर वादग्रस्त पोस्ट टाकली होती. ही पोस्ट एका तरुणाने वाचल्यानंतर त्यास बसस्थानकावर बोलावले. संबंधित तरुण हा सायंकाळी बसस्थानकावर आला असता त्याला जमावाने मारहाण केली. यानंतर दुसरा गट तेथे आला. या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस बसस्थानकावर पोहोचले. त्यांनी हा वाद मिटवला. यानंतर पोलीस ठाण्यात दोन्ही गट आले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे व पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी तरुणांसोबत चर्चा करुन शांतता प्रस्थापित केली.